महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, उस्मानाबाद.

GOVERNMENT MEDICAL COLLEGE, OSMANABAD

New Building, Civil Hospital Compound, Osmanabad. (Maharashtra) 413 501

**E-mail:** deangmcosmanabad@gmail.com

जा.क्र.शावैमउ/औषधी भांडार / 2144 /2023 दिनांक 08/02/2023

## जाहीर नोटीस

**विषय:- सन 2022-23 या आर्थिक वर्षात शासकिय महाविद्यालय व रुग्णालय उस्मानाबाद करिता मार्च 2023 पर्यंत लागणाऱ्या औषधी व सर्जिकल साहित्याच्या स्थानिक खरेदीकरिता दरपत्रके सादर करणे बाबत**

औषधी व सर्जिकल साहित्य पुरवठादारांना कळविण्यात येते कि, सन 2022-23 या आर्थिक वर्षात शासकिय वैदयकिय महाविद्यालय व रुग्णालय उस्मानाबाद करीता औषधी व सर्जिकल साहित्य खरेदी करावयाचे आहे. करीता इच्छुक पुरवठादारांनी आपले दरपत्रके खालील नमुन्यानुसार बंद लिफाफ्यात खालील अटी व शर्ती च्या अधिन राहून सदर जाहीर सूचना **gmcosmanabad.org.in** या अधिकृत शासकीय वेब साईटवर प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून ते दिनांक 23 / 02 / 2023 रोजी सायंकाळी 5 : 30 वाजेपर्यंत सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत या कार्यालयात सादर करावे.

| Sr No | Name Of Item | Unit | Proposed Quantity | Basic Rate | GST Extra % |
|---|---|---|---|---|---|
| 1 | F6 Dialyser sterilised - Disposable & single use | Nos | 1360 | | |
| 2 | F8 Dialyser sterilised - Disposable & single use | Nos | 24 | | |
| 3 | Albumin Inj 20 % 100 ml | Bottle | 7 | | |

## अटी व शर्ती :-

१) दरपत्रके दि.14 / 02 /2003 रोजी पासुन ते दि.23 / 02 /2023 सायं. 5 :00 वाजेपर्यंत सिलबंद लिफाफयामध्ये या कार्यालयाच्या आवक विभागामध्ये कार्यालयीन वेळेमध्ये स्वीकारण्यात येतील व वेळेत न आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

२) प्राप्त दरपत्रके दि 24 / 02 / 2023 रोजी ठिक 11 : 30 वाजता शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय उस्मानाबाद येथे उघडण्यात येवून पुरवठाधारकानी दिलेले किमान दर मान्य करून तदनंतर किमान दर असणाऱ्या पुरवठाधारकास रुग्णालयाच्या आवश्यकतेप्रमाणेच औषधी व सर्जिकल साहित्याचे पुरवठा आदेश देण्यात येतील.

३) रुग्णांच्या गरजेनुसार खरेदी ( Emergancy local purchase ) करण्यात येत असल्याने अनुक्रमांक 3 या औषधी व सर्जिकल साहित्याचे या कार्यालयाकडून पुरवठा आदेश दिल्यानंतर एकुण पुरवठा आदेशाच्या कमीत कमी 25% ( पंचेवीस टक्के ) औषधी व सर्जिकल साहित्याचा पुरवठा चोवीस तासाच्या आत औषधी भांडार शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय उस्मानाबाद येथे पुरवठाधारकांनी स्वत: करावा व उर्वरीत शिल्लक साठा व यादीमधील ईतर सर्व औषधी व सर्जिकल साहित्याचा पुरवठा तिन दिवसाच्या विहित मुदतीमध्ये औषधी भांडार शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय उस्मानाबाद येथे पुरवठाधारकांनी स्वत: करणे आवश्यक आहे.विहीत मुद्दतीत औषधी व सर्जिकल साहित्याचा पुरवठा या कार्यालयास प्राप्त न झाल्यास L2 पुरवठादाराकडुन किंवा स्थानिक बाजारातुन आवश्यकतेनुसार औषधी व सर्जिकल साहित्य खरेदी करण्यात येईल. L2 पुरवठादाराकडुन किंवा स्थानिक बाजारातुन खरेदी केलेल्या औषधी व सर्जिकल साहित्याची खरेदी किमत L1 पुरवठादारा पेक्षा जास्त असल्यास सदरील फरकाची रक्कम L1 पुरवठादाराकडुन वसुल करण्यात येईल.

४) दोन किंवा दोन पेक्षा अधिक पुरवठादारा नी दिलेले दर सर्वात कमी व समान असतील तर सर्वात कमी व समान दर असणाऱ्या पुरवठादाराना आवश्यकतेनुसार विभागून पुरवठा आदेश देण्यात येतील.

५) **पुरवठाधारकाने दरपत्रकासोबत १) शॉप ॲक्ट प्रमाणे औषधी दुकान परवाना** २) मुळ संस्थेचे किंवा पुरवठाधारकाचे आधारकार्ड ३) मुळ संस्थेचे किंवा पुरवठाधारकाचे पॅनकार्ड ४) जिएसटी लागू असल्यास जिएसटी प्रमाणपत्र किंवा जिएसटी लागू नसल्यास त्या बाबतचे घोषणापत्र ५) संस्थेचे किंवा फर्मचे बँक खाते बाबतचा ( Cancel cheque or Pass Book Zerox ) पुरावा ....... इत्यादी कागदपत्रे जोडावीत.पुरवठाधारकानी दोन वेगवेगळे बंद लिफाफे सादर करुन पहिल्या लिफाफ्यात दरपत्रके व हमीपत्र तर दुसऱ्या लिफाफ्यात फर्मबाबतची कागदपत्रे जोडावीत. बंद लिफाफ्यावर **" औषधी दरपत्रक क्र. 5 "** असे स्पष्टपणे लिहावे.

६) **एका पुरवठाधारकास एकच दरपत्रक सादर करण्याची परवानगी असेल.** औषधी व सर्जिकल साहित्याच्या देण्यात येणाऱ्या दरपत्रकामध्ये औषधी व सर्जिकल साहित्याची मुळ किंमत व लागु असलेले कर (जीएसटी) दर्शविण्यात यावे.

७) देयकावर जीएसटी नंबर असणे आवश्यक आहे. जीएसटी शिवाय देयक स्विकारले जाणार नाहीत. आपण सादर केलेल्या मूळ दर व जिएसटी शिवाय इतर कोणत्याही प्रकारचे आगावू खर्च ( वाहतूक भाडे/हमाली/ डिलीव्हरीने पोहच चे चार्जस ) अदा करण्यात येणार नाहीत याची नोंद घ्यावी.

८) औषधी व सर्जिकल साहित्याचा पुरवठा वाहतुकी दरम्यान तुट फुट/ खराब झाल्यास विना विलंब बदलुन देणे बंधनकारक राहिल.

९) तसेच सदरील औषधी व सर्जिकल साहित्याची देयके वरीष्ठ कार्यालयाकडुन जसे अनुदान प्राप्त होईल त्याप्रमाणे अदा करण्यात येईल.

१०) पुरवठाधारकानी पुरवठा केलेली औषधी व सर्जिकल साहित्य अप्रमाणित ( Substandard ) असल्यास या कार्यालयाने मान्य केलेल्या दरानुसारच विना विलंब बदलुन देणे बंधनकारक राहिल.

११) कोणतेही कारण न देता प्राप्त दरपत्रक पैकी कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचा अथवा फेटाळण्याचा व दरपत्रक प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रदद करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखुन ठेवला आहे.

१२) यादीमधील सर्व औषधी व सर्जिकल साहित्य दर्शिवलेल्या संख्येनुसार खरेदी करणे बंधनकारक राहणार नाही.

१३) हमीपत्र -:एकल दरपत्रक सादर करणेसंबंधीचे हमीपत्र व दरपत्रक मागणी पत्रातील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र अशी दोन हमीपत्र सोबतच्या नमुन्यामध्ये पुरवठाधारकानी सादर करावीत .

**अधिष्ठाता**
**शासकिय वैद्यकिय महाविद्यालय**
**व रुग्णालय उस्मानाबाद**

**प्रत :-** 1 ) सूचना फलक शासकिय वैद्यकिय महाविद्यालय उस्मानाबाद
2 ) संकेत स्थळ जाहीर नोटीस शासकिय वैद्यकिय महाविद्यालय उस्मानाबाद

**मागणी पत्रातील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत हमीपत्र**
**दरपत्रकधारक अधिकृत विक्रेता/पुरवठादार/कंपनी यांचे लेटरहेड**

Letter No.

Date :-

प्रति
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
उस्मानाबाद.

विषय :- दरपत्रक मागणी पत्रातील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत हमीपत्र सादर करणेबाबत...

संदर्भ :- आपले दरपत्रक मागणी पत्र
क्रमांक. ____________________
दिनांक ____________________

महोदय

संदर्भाकिंत दरपत्रक मागणी पत्रातील सर्व अटी व शर्ती मी वाचून दरपत्रक दरपत्रकप्रक्रियेसाठी सादर करीत आहे. सर्व अटी व शर्ती मान्य असून तद्संबंधीचे हमीपत्र खालील प्रमाणे सादर करीत आहे.

## <u>हमीपत्र (Undertaking)</u>

याद्वारे हमी देतो की, दरपत्रक मागणी पत्रात नमुद असलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असुन, त्यांचे तंतोतंत पालन करण्यात येईल. तसेच दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात सादर करण्यात आलेली संपुर्ण माहिती, दस्ताऐवज, व कराररनामे इ. भविष्यात असत्य/बनावट/अवैध आढळुन आल्यास, सर्वस्वी जबाबदारी आमची राहील. नियमानुसार होणाऱ्या कार्यवाहीस मी/आम्ही पात्र असू. तद्संबंधी माझी/आमची कुठलीही हरकत राहणार नाही. अशी याद्वारे हमी देत आहे.

अधिकृत व्यक्तिचे नाव व स्वाक्षरी,
शिक्का अणि मोहर
Authorized Person Name,
Signature
with Stamp and Seal

**एकल दरपत्रक अधिकृत विक्रेता/पुरवठादार/कंपनी यांचे लेटरहेड**

Letter No. Date :-

प्रति
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
उस्मानाबाद.

विषय :- एकल दरपत्रक सादर करणेसंबंधीचे हमीपत्र सादर करणेबाबत...

संदर्भ :- आपले दरपत्रक मागणी पत्र
क्रमांक. ____________________
दिनांक ____________________

महोदय

संदर्भांकित दरपत्रक मागणी पत्रानुसार मागणी करण्यात आलेले एकल दरपत्रक सादर करण्यासंबंधीचे हमीपत्र मी खालील प्रमाणे सादर करीत आहे.

## <u>हमीपत्र (Undertaking)</u>

याद्वारे हमी देतो की, दरपत्रक प्रक्रियेसाठी एकच दरपत्रक सादर करीत आहे. आमच्याच फर्मशी निगडीत असलेल्या कुठल्याही व्यक्तीच्या नावे किंवा अप्रत्यक्षपणे केवळ आम्हास लाभ होईल, अश्याप्रकारे दुसरे दरपत्रक दरपत्रकप्रक्रियेमध्ये सादर केलेला नाही. तसेच माझा/आमचा आपल्या कार्यालयातील खरेदी प्राधिकाऱ्यांशी कुठलेही हितसंबंध नाही.

उक्त बाब भविष्यात असत्य/खोटी आढळुन आल्यास, सर्वस्वी जबाबदारी आमची राहील. नियमानुसार होणाऱ्या कार्यवाहीस मी/आम्ही पात्र असू. तद्संबंधी माझी/आमची कुठलीही हरकत राहणार नाही. अशी याद्वारे हमी देत आहे.

अधिकृत व्यक्तिचे नाव व स्वाक्षरी, शिक्का
अणि मोहर
Authorized Person Name,
Signature
with Stamp and Seal